# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र – ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

क्र. परीक्षा/कें.मु.कें./१७७७/२०१८

दिनांक : ०३ मे, २०१८

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचलित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, महाविद्यालयाचे प्राचार्य विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, प्रथम सत्र २०१८ च्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीचे काम On Screen Marking द्वारे सुरू झालेले आहे व विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयातील प्राध्यापकांचा On Screen Marking साठी नोंदणीअभावी उत्तरपत्रिका तपासणीसाठी अल्प प्रतिसाद मिळत आहे. OSM द्वारे उत्तरपत्रिका तपासणी करून वेळेत निकाल जाहीर करणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९३ अन्वये बंधनकारक आहे.

प्रथम सत्र २०१८ च्या परिक्षेचे आजपर्यत जवळपास <u>७,४१,०००</u> इतक्या उत्तरपुस्तिका OSM मार्फत तपासण्यास उपलब्ध असून पुढील काही दिवसांत जवळपास १८ लाख उत्तरपुस्तिका उपलब्ध होणार आहे. तरी मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य यांना या परिपत्रकाद्वारे पुन:श्च एकदा सुचित करण्यात येते की, आपल्या विभागातील/महाविद्यालयातील संस्थेतील शिक्षकांना त्वरीत OSM प्रणाली मार्फत उत्तपुस्तिकांचे मुल्यांकन सुरू करण्यास सांगण्यात यावे.

तसेच आपणांस अशीहि विनंती करण्यात येते की, **<u>समर व्हेकेशन कालावधी मध्ये सर्व</u>** CAP Centre सकाळी ७.३० ते रात्री १०.३० पर्यत सुरू राहणार असून ज्या महाविद्यालयात तांत्रिक अडचणीमूळे CAP Centre सुरू होऊ न शकल्यामूळे त्या महाविद्यालयातील प्राध्यापकांना इतर CAP Centre सुरू असलेल्या महाविद्यालयांनी मुल्यांकन करण्याची परवानगी दयावी तसेच प्राध्यापकांना वेळेत निकाल लावण्याच्या दृष्टीने उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन करून सहकार्य करण्याचे आव्हान करण्यात येत आहे आणि आपल्या सहकार्याची अपेक्षा बाळगत आहे.

संचालकांकरिता
परीक्षा व मुल्यमापन मंडळ